नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०६/२०२५ (रविवार)**

---

## श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य लावण्यात आला कडेकोट बंदोबस्त, मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केली बंदोबस्ताची पाहणी

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक ०६/०७/२०२५ व दि. १२/०७/२०२५ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यादरम्यान अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंड्या आणि पालख्यांचे आगमन होत असते.

मौजा धापेवाडा येथील श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान येथील यात्रे निमित्य मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात सदर बंदोबस्ताची योग्य आखणी केली. **सदर ठिकाणी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आलेले आहे**. बी.डी.डी.एस पथक, श्वान पथक, घातपात विरोधी पथक तैनात असुन ठिकठिकाणी वैदयकीय पथके,रूग्णवाहीका, मदत पथके, अग्निशमन दल इत्यांदीची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच नदीकाठी जीवरक्षक हजर ठेवण्यात आलेले आहे. योग्य वाहतुक व्यवस्थापन करण्यासाठी बंदोबस्त नेमण्यात आला आहे. सदर बंदोबस्ताचे प्रभारी अधिकारी श्री अनिल म्हस्के, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर हे असुन सदर बंदोबस्तात ,२ पोलीस निरीक्षक, १७ सपोनि /पोउपनि, ८६ पोलीस अंमलदार , २६ महीला पोलीस अंमलदार, ३८ वाहतुक पोलीस अंमलदार, १ दंगा नियंत्रण पथक वाहनासह असे अधिकारी/अंमलदार नेमण्यात आलेले आहे.

**आज दिनांक ०६/०७/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा येथे भेट देवुन संपुर्ण मंदीर**

परीसराची तसेच बंदोबस्ताची पाहणी केली. तसेच सदर यात्रा दिनांक १२/०७/२०२५ रोजी पावेतो असुन बंदोबस्तात हजर असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना सतर्कतेने बंदोबस्त पार पाडण्याबाबत सुचना दिल्या आहे. सदर वेळी श्री रमेश धुमाळ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा हे सुध्दा हजर होते.






## नागपुर ग्रामीण जिल्हा अंतर्गत मोहरम निमित्य लावण्यात आला कडेकोट बंदोबस्त, काटोल येथे मातम मिरवणुक बंदोबस्ताला मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट

दिनांक २७/०६/२०२५ ते दिनांक ०६/०७/२०२५ रोजी पर्यंत मोहरम हा सण साजरा करण्यात येत असुन दिनांक ०६/०७/२०२५ रोजी मोहरम सणाची सांगता करण्यात येणार असल्याने त्या निमित्य ताबुत, सवारी, पंजे, डोले  इत्यादींच्या मिरवणुका काढण्यात येतात.

मोहरम निमित्य नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी हे

आपआपल्या उपविभागाात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत कडक पेट्रोलीग करतील तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनिस्त अधिकारी / अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोर पणे बजावणे बाबत मा. पोलीस आधिक्षकांनी सुचना दिल्या आहेत. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण आणि सर्व २२ पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त लावला असुन बंदोबस्तासाठी होमगार्ड— ६०० पुरूष आणि १०० महीला असे अतिरिक्त मनुष्यबळ मागविण्यात आले आहे. दंगा नियंत्रण पथक यांचा बंदोबस्तामध्ये समावेश आहे. विशेष ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहे. घातपात विरोधी पथक सुध्दा तैनात असुन ४ पोलीस अधिकारी आणि २२ पोलीस अंमलदार हे वाहनासाह नियंत्रण कक्ष येथे बंदोबस्तातकरीता राखीव ठेवण्यात आले आहे.तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन काटोल येथे मातम मिरवणुक असते त्यात १००० ते १५०० जनसमुदाय असतो त्यासाठी ०४ अधिकारी आणि ४० अंमलदार असा बंदोबस्त लावण्यात आलेला होता. **नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस बारकाईने सोशल मिडीया मॉनिटरींग करीत असुन कोणत्याही धर्माच्या/ जातीच्या/समुदायाच्या धार्मिक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल याप्रकारचे कृत्य करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे नोंद करण्यात येणार आहे.**

**आज दिनांक ०६/०७/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी काटोल येथील मातम मिरवणुकी दरम्यान बंदोबस्ताला भेट देवुन बंदोबस्ताची पाहणी केली होती.काटोल येथील मातम मिरवणुक बंदोबस्त शांततेत पार पाडला आहे.**




कडू हॉस्पिटल
सरस्वती झेरॉक्स
FIRE

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. खापरखेडा :— दिनांक ०५/०६/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की इंदीरानगर आबादी परीसरात देवधन उर्फ बोदु तेलंगे , रितीक दुपारे आणि एक विधीसंघर्ष ग्रस्त बालक असे पल्सर मोटर सायकलवर बसुन दोन तलवार हातात घेवुन परीसरात फिरत आहेत. अशी माहीती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले असता पोलीसांना पाहुन तिघेही शस्त्र आणि मोटर सायकल जागीच सोडुन पळु लागले. परंतु पोलीसांनी त्यांचा पाठलाग केला आणि आरोपी नामे देवधन उर्फ बोदु रज्जुराव तेलंगे, वय ३२ वर्षे, वार्ड क्रं ४ आबादी, खापरखेडा याला शिताफिने पकडले. इतर दोन आरोपी अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. पोलीसांनी पंचासमक्ष दोन धारदार लोखंडी तलवार आणि बजाज पल्सर मोटर सायकल क्रं एम.एच ४० सी.एस २८६२ असा एकुण किंमत ८०,४०० /— रूपयांचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**आरोपी नामे देवधन उर्फ बोदु रज्जुराव तेलंगे, वय ३२ वर्षे,रा. वार्ड क्रं ४ आबादी, खापरखेडा, रितीक सुरेश दुपारे, रा. वार्ड क्रं ४ आबादी, खापरखेडा आणि विधीसंघर्ष ग्रस्त बालका यांच्या विरूद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी नामे देवधन उर्फ बोदु रज्जुराव तेलंगे याला अटक करण्यात आली आहे.**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :— दिनांक ०६/०६/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की एक इसम नामे पवन वानखेडे हा धरम नगर पिपरी, कन्हान जि. नागपुर येथे त्याच्या घराजवळ हातात घेवुन परीसरात फिरत आहेत. अशी माहीती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले सदर आरोपीचा शोध घेतला असता तो घरी मिळुन आला. त्याला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव पवन गोपाल वानखेडे, वय ३६वर्षे, धरम नगर पिपरी, कन्हान जि. नागपुर असे समजले. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुनल एक धारदार लोखंडी तलवार किंमत ५०० /— रूपये असा मुददेमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**आरोपी नामे** पवन गोपाल वानखेडे, वय ३६वर्षे, धरम नगर पिपरी, कन्हान जि. नागपुर **याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे**.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०५/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०६/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत भिवापुर टाउन येथे श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन भिवापुर येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत बायपास चौक, उमरेड येथे येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. रात्री मोहरम निमित्य लावण्यात आलेला बंदोबस्ताची पाहणी करण्यात आली.




MH-40






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने